# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यार्थी आरोग्य सेवा योजना

### परिपत्रक क्रमांक ५: दिनांक १ जुलै २०१५

विषय : विद्यापीठ आवारात योगासनवर्ग सुरु झाल्याबाबत....

२१ व्या शतकाच्या दुस—या दशकात उभे असतांना विज्ञान व तंत्रज्ञानाची झपाटयाने प्रगती होत असल्याने अनेक आजार बरे करण्यात यश मिळाले आहे. तथापी त्याचबरोबर निरनिराळे आजार उदा. अति रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग, लठठपणा, मधूमेह, अपघात इत्यादींचे प्रमाण वाढत असत्याचे दिसते व त्यामुळे होणारे नुकसानही वाढत आहे. बहूतेक वरील सर्व आजार आपल्या बदलत्या जीवनशैलीमुळे होत आहेत. यास्तव आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी आरोग्यदायी जीवनशैली अवलंबणे ही काळाची गरज आहे असे वाटते.

याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ अधिकार मंडळाने विद्यापीठाच्या आरोग्य केन्द्राच्या आवारात योगकेन्द्र सुरु केले असुन त्याठिकाणी सर्वांसाठी योगासन वर्गाचे आयोजन नियमीत स्वरुपावर करण्यात येणार आहे. त्याचा तपशील व योगवर्गाचे वेळापत्रक खालील प्रमाणे.

स्थळ : योगमंदिर , आरोग्य केन्द्र , विद्यापीठ आवारात.

| अक्र | योगवर्गाचे सत्र | वेळा | शुल्क (तिन महिने कालावधीसाठी) |
|---|---|---|---|
| १ | सकाळचे सत्र | सकाळी ७.३० ते ८.३०<br>सकाळी ८.३० ते ९.३० | १. विद्यापीठ सेवक : रु २२५/—<br>२. विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थी :रु २२५/— |
| २ | सायंकालीन सत्र | सायंकाळी ६.०० ते ७.०० | ३. वर १ व २ मध्ये समाविष्ट नसलेले भारतीय नागरीक रु ४५०/—<br>४. परदेशी विद्यार्थी रु १०००/— |

यावयतीरिक्त प्रत्येक महिन्याच्या तिस—या किंवा चौथ्या आठवडयात पाच दिवस मुदतीच्या "योगासनांच्या सहाय्याने प्रतिबंधात्मक उपचार तसेच योगीक क्रियांचे प्रशिक्षण" बाबतच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आरोग्य केन्द्र कार्यालयातून माहिती द्यावी. ( दुरध्वनी संपर्क: ०२० २५६०१३५०)

तरी ज्यास्तीत जास्त व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा हि विनंती.

डॉ. शशिकांत दुधगांवकर
निवासी वैद्यकीय अधिकारी व
समन्वयक, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना

प्रत माहितीसाठी : १. मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग,सा.फु.पु.वि.
४. मा. वसतिगृह प्रमुख, विद्यापीठ वसतिगृहे, सा.फु.पु.वि.